आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१२ डिसेंबर २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यसभेत विरोधकांचा स्थगन प्रस्ताव फेटाळल्यामुळे गदारोळ, कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात लागू करण्याची नितीन गडकरी यांची लोकसभेत माहिती, महाराष्ट्रात सुरु असलेले ७८ रस्ते प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचं आश्वासन
- छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत सात माओवादी ठार

  **आणि**
- फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आज भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश आणि चीनचा डिंग लिरेन यांच्यात अंतिम सामना होणार

**<><><><><>**

राज्यसभेत विरोधी पक्षाने दिलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. त्याला सत्ताधारी भाजपा खासदारांनी दिलेल्या प्रत्युत्तरानंतर राज्यसभेत एकच गोंधळ झाला. या गोंधळातच अध्यक्षांनी राज्यसभेचं कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकुब केलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतरही सदस्यांनी गोंधळ केल्यामुळे ते दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

सकाळच्या सत्रात भाजपा खासदार जे.पी. नड्डा यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यावर टीका केली. ते म्हणाले की स्थगन प्रस्ताव स्विकारण्याच्या संदर्भात अध्यक्षांना प्रश्न विचारता येत नाही. मल्लिकार्जुन खरगे यांनी सदनाच्या मर्यादेचं उल्लंघन करत असून काँग्रेस राज्यसभा अध्यक्षांच्या पदाचा अपमान करत आहेत. असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अदानी लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीच्या मागणीसाठी आज संसद परिसरात विरोधी पक्षानं आंदोलन केलं. या आंदोलनात काँग्रेस, मार्क्सवादी आणि इतर विरोधी पक्षाचे खासदार सहभागी झाले होते.

**<><><><><>**

रस्ते अपघातात जखमी होणाऱ्यांसाठी कॅशलेस उपचार योजना लवकरच देशभरात सुरू होणार असल्याची माहिती  केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. या योजनेमुळे रस्ते अपघातातल्या जखमींना रुग्णालयात दीड लाख रुपयांपर्यंतचे उपचार कॅशलेस पद्धतीने मिळू शकतील, असं गडकरी यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट गडकरी**

लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महाराष्ट्रातल्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर विविध सदस्यांनी प्रश्न विचारले. धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी महामार्ग भूसंपादनात शेतकऱ्यांना किरकोळ मोबदला मिळत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. २०१३च्या कायद्याप्रमाणे भूसंपादन करावं, अशी मागणी त्यांनी केली. यावर गडकरी यांनी, भूसंपादन हे राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे होत असल्याचं सांगितलं. धाराशिव शहर सुरत - चेन्नई महामार्गाला जोडण्यासंदर्भातही निंबाळकर यांनी विचारणा केली, तेव्हा या संदर्भात विचार करण्याचं आश्वासन गडकरी यांनी दिलं.

उमरगा - सोलापूर राष्ट्रीय महामार्ग अद्याप पूर्ण झाला नसून, त्यामुळे या रस्त्यावर अपघातांचं प्रमाण वाढत असल्याकडेही खासदार निंबाळकर यांनी लक्ष वेधलं. तसंच टेंभुर्णी - लातूर मार्गाचं चौपदरीकरणासंदर्भात विचारणा केली. एका महिन्यात यासंदर्भात निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती गडकरी यांनी दिली.

परभणीचे खासदार संजय जाधव यांनी परभणीला राष्ट्रीय किंवा राज्यमार्गाला जोडण्यासाठी विनंती केली. यावर बोलताना गडकरी यांनी, महाराष्ट्रात ७८ प्रकल्प सुरु असून, लवकरात लवकर ते पूर्ण करण्याचं आश्वासन दिलं.

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांनी अहिल्यानगर - शिर्डी मार्गाची दुरावस्था झाली असल्याचं सांगितलं. हा अडीच हजार कोटी रुपयांचा प्रकल्प असून, १५ दिवसांचं टेंडर काढून कामाला सुरुवात करणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. रस्त्यांच्या कामात दिरंगाई करणार्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यासाठी कायदा करण्याची मागणी वाघचौरे यांनी केली.

पूर्वी कंत्राटदारांसाठी शिथिल केलेले नियम आता पुन्हा कडक केले असल्याची माहिती गडकरी यांनी दिली. नंदुरबारचे खासदार गोवाल पाडवी यांनी पिंपळनेर ते सटाणा रस्त्याबाबत, तर मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी देहू - पंढरपूर पालखी मार्गात असलेल्या संरक्षण विभागाच्या जागेतल्या जागेबाबत विचारणा केली. हे दोन्ही मार्ग लवकरात लवकर पूर्ण होतील, असं गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी काल देशभरातल्या ५१ केंद्रांवर सुरु झाली. आज या फेरीचा दुसरा दिवस आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल दूरस्थ माध्यमातून या हॅकेथॉनचं उद्घाटन केलं होतं. तसंच, हॅकेथॉनमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांनी काल दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला. देशातले युवक सरकारला साथ देत देशासमोरच्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी काम करत आहेत, त्यामुळे भारत विकसित होण्याच्या मार्गावर आहे, याबद्दल आपल्याला विश्वास वाटतो असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं.

या स्पर्धेत राज्यातली चार केंद्रही सहभागी झाली आहेत. त्यापैकी मुंबईतल्या वेलिंगकर संस्थेतले ३४ संघ गृह मंत्रालय, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या सहा समस्यांचं निराकरण करण्यासाठी काम करत आहेत. याविषयी केंद्रप्रमुख निलेश लेले यांनी माहिती दिली.

**होल्ड बाईट - निलेश लेले**

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांशी आज झालेल्या चकमकीत सात माओवादी ठार झाले. नारायणपूर जिल्ह्यातल्या दक्षिण अबोझमद भागात केंद्रीय राखीव पोलीस दल, विशेष तपास पथक आणि जिल्हा राखीव दल यांनी संयुक्तपणे राबवलेल्या शोध मोहिमेदरम्यान आज सकाळी ही चकमक झाली. या माओवाद्यांचे मृतदेह सुरक्षा दलांनी ताब्यात घेतले असून परिसरात गोळीबार आणि शोधमोहीम अजूनही सुरू आहे.

**<><><><><>**

फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आज दुपारी भारताचा ग्रँडमास्टर डी. गुकेश आणि चीनचा गेल्या वेळचा विजेता डिंग लिरेन यांच्यात चौदावा आणि अंतिम सामना होणार आहे. या सामन्यातील विजेत्याला जागतिक विजेत्याचा मान मिळणार आहे. हा सामना अनिर्णित राहिल्यास उद्या स्पीडचेस प्रकारातून विजेता निवडला जाईल. काल गुकेश आणि लिरेन यांच्यात तेरावा सामना पाच तासांच्या लढतीनंतरही अनिर्णित राहिला. दोन्ही खेळाडूंना सध्या प्रत्येकी साडेसहा गुण मिळाले आहेत.

**<><><><><>**

चीनच्या हांगझोऊ येथे सुरू असलेल्या बॅडमिंटन वर्ल्ड टूर फायनलमध्ये ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या भारतीय महिला दुहेरी जोडीनं मलेशियाच्या परली टॅन आणि थिनाह मुरलीधरन या जोडीचा पराभव करून तिसऱ्या फेरीत

प्रवेश केला. भारतीय जोडीनं आज दुसऱ्या गटातील सामन्यात मलेशियाचा २१-१९, २१-१९ असा सरळ गेममध्ये पराभव केला. या स्पर्धेत भारताचं प्रतिनिधित्त्व करणारी ट्रीसा आणि गायत्री यांची जोडी ही एकमेव जोडी आहे.

**<><><><><>**

आगामी हॉकी इंडिया लीगचे थेट प्रक्षेपण करण्यासाठी प्रसार भारतीनं आज नवी दिल्ली इथं हॉकी इंडियासोबत सामंजस्य करार केला आहे. या सामंजस्य करारामुळे, दूरदर्शन हॉकी इंडिया लीग २०२४-२५ साठी अधिकृत प्रसारण भागीदार बनले आहे.

या प्रसंगी हॉकी इंडिया लीग च्या प्रशासकीय समितीचे सदस्य भोलानाथ सिंग आणि प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत सहगल यांनी सामंजस्य कराराची देवाणघेवाण केली. प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, आकाशवाणीच्या महासंचालक प्रज्ञा पालीवाल गौर, दूरदर्शनच्या महासंचालक कांचन प्रसाद, दूरदर्शनच्या वृत्तविभागाच्या महासंचालक प्रिया कुमार आणि इतर अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

'एक देश, एक विद्यार्थी ओळख' या संकल्पनेतून राबवण्यात येणाऱ्या 'अपार' अर्थात ऑटोमेटेड परमनंट अकॅडमी अकाउंट रजिस्ट्री नोंदणीत सिंधुदुर्ग जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे. अहिल्यानगर दुसऱ्या स्थानावर तर रत्नागिरी तिसऱ्या क्रमांकावर आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ९ लाख ६८ हजार ३४ विद्यार्थ्यांपैकी ८ लाख १९ हजार ९५ विद्यार्थ्यांची 'अपार' नोंदणी पूर्ण झाली आहे. अपारच्या माध्यमातून देशातल्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा स्वतंत्र ओळख क्रमांक आणि सोबतच डिजिलॉकरची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

देशांतर्गत पर्यटनात २०२३ च्या तुलनेत ९५ टक्क्यांनी वाढ झाल्याचं सांस्कृतिक आणि पर्यटक मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी सुरु असलेल्या विविध योजनांविषयी प्रसारमाध्यमांशी बोलत होते. २०२२-२३ या आर्थिक वर्षात पर्यटन क्षेत्रानं ७ कोटी लोकांना रोजगार मिळवून दिल्याचही त्यांनी सांगितलं.